# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महा मेट्रो च्या वतीने रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम

## १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग




नागपूर : महा मेट्रो नागपूरने मेट्रो रेल प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम शहराच्या चारही दिशांनी वेगाने सुरू असून,नागरीकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. ही बाब नागपूर मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील कामकाजादरम्यानही ठळकपणे आढळली होती.

या उपक्रमांतर्गत, सामाजिक उत्तरदायित्वाचा एक भाग म्हणून नेहरू विद्यालय, हिंगणा येथे रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत आवश्यक अशा गोष्टींची माहिती देणे हा होता. यात सुरक्षित रस्ता ओलांडण्याच्या पद्धती, पादचारी मार्गांचा योग्य वापर आणि वाहतूक चिन्हांची समज यांचा समावेश होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी विशेष पादचारी मार्ग तयार करण्यात आले होते आणि मेट्रोच्या

निर्माणकार्या स्थळी सुरक्षिततेसाठी ट्रॅफिक मार्शल्सकडून मदत घेण्याचे आवाहन करण्यात आले. हे संपूर्ण सत्र शाळेचे प्रशासन व महा मेट्रोच्या प्रकल्प सुरक्षा टीमच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

या उपक्रमाला जवळपास १२०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे युवा वर्गामध्ये रस्ता सुरक्षा विषयी जागरूकता वाढीस लागली. ही मोहीम कल्पतरू प्रोजेक्ट्स इंटरनॅशनल लिमिटेड यांच्या सहकार्याने राबविण्यात आली.




